**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**
**गुरुवार, दिनांक ०२ मार्च, २०२३ / फाल्गुन ११, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

**सिंहगड किल्ला आणि पानशेतकडे (जि.पुणे) जाणाऱ्या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत**

**(१) * ५७५४० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड रस्त्यावरील खडकवासला धरण परिसरात (जि.पुणे) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु असलेले सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहगड किल्ला आणि पानशेतकडे जाणाऱ्या या मार्गावर दररोज हजारो पर्यटक प्रवास करीत असून कोंढणपूर फाटा मार्गे जाणाऱ्या सिंहगड रस्ताचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन संथ गतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सदर रस्ता राज्य मार्ग दर्जाचा असून प्रश्नांकीत लांबीत रक्कम रु. १२.०० कोटीचे रस्ता कॉक्रीटीकरण व सुधारणा करण्याचे मंजूर काम करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे व विहित मानकाप्रमाणे सद्यस्थितीत प्रगतीत असून जुलै, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) कोंढणपूर फाटा मार्गे सिंहगड किल्ल्याकडे जाणा-या रस्त्याचे हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत मंजूर काम पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, कोंढणपूर जवळील १२०० मी. लांबीमध्ये स्थानिकांनी घेतलेल्या हरकतीमुळे सदर लांबीतील रस्त्याचे काम मंजूर कामाच्या वावामधुन वगळण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर लांबीमध्ये रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील वन पट्टेधारक शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणीची सुविधा मिळण्याबाबत**

**(२) * ५८५०३ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने आदिवासी विकास महामंडळच्यावतीने कार्यान्वीत धान विक्री केंद्रावर शेतकऱ्यांना प्रभावी सेवा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने सातबारा संगणकीकरण परियोजना सुरु करुन सर्व भूमीअभिलेख रेकॉर्ड डिजिटलाइज करुन डिजीटल नोंदणी करणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयात वन अधिकार अधिनियमानुसार वनपट्टेधारक शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणीची सुविधा नसल्याने ९०% शेतकऱ्यांनी धान घरीच ठेवले असून त्यांना कमी किंमतीत व्यापाऱ्यांना धान विकावे लागत असल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गडचिरोली जिल्हयातील वनपट्टेधारक शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वनहक्क पट्टेधारक शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी दि.१०.०२.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती व धान खरेदीसाठी दि.२८.०२.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ओणी-अणुस्कुरा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३) * ५७४३३ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा घाट माहे जुलै, २०२१ च्या अतिवृष्टीपासून बंद असल्यामुळे वाहतूक अणुस्कुरा घाटमार्गे (ता.राजापूर) वळवण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढलेल्या वाहतूकीमुळे ओणी अणुस्कुरा मार्गावर मोठ-मोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गाच्या रुंदीकरणासह डांबरीकरण देखील करणे अत्यंत गरजेचे असतांना निधीअभावी सद्य:स्थितीत केवळ खड्डे बुजविण्याचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मार्गाचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कालावधीत वाढलेल्या वाहतुकीमुळे ओणी अणुस्कुरा मार्गावर पावसाळयात खड्डे पडले होते. परंतू सदर खड्डे देखभाल दुरुस्तीच्या कामांतर्गत भरुन रस्ता वाहतुकीस सुरळीत आहे.

(३) व (४) प्रश्नांकित ओणी अणुस्कुरा या ३५ किमी लांबीपैकी ११.३२५ किमी लांबीत मजबुतीकरण व

डांबरीकरणाचे काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे. उर्वरित लांबीतीत कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राध्यापकाने केलेली मारहाण

**(४) * ५६७८४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरातील नामांकित के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील १३ ते १४ विद्यार्थी डहाणू (जि.पालघर) येथे राष्ट्रीय सेवा योजनांच्या शिबिरासाठी गेले असता एका प्राध्यापकाने या विद्यार्थ्यांना अर्धनग्न करून मारहाण केल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, विद्यार्थ्यांना मारहाण करून अर्धनग्न अवस्थेत थंडीत दोन तास उभे करून ठेवण्यात आले असून सदरची घटना घडल्यानंतर हे विद्यार्थी प्रचंड मानसिक दबावाखाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांनी प्राचार्यांकडे तक्रार करुनही अद्यापपर्यंत सदर प्राध्यापकावर कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर घटनेच्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाद्वारे चौकशी करण्यात येत आहे. प्राचार्यांच्या अहवालानुसार कोणताही विद्यार्थी मानसिक दबावाखाली नाही व ते नियमितपणे महाविद्यालयात तासिकेला उपस्थित राहतात.
(३), (४), व (५) हे खरे नाही.

घडलेल्या घटनेबद्दल सदर प्राध्यापकावर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाची चौकशी सुरू आहे, तसेच महाविद्यालयाने दिनांक १४.०१.२०२३ रोजी सदर प्राध्यापकास व्यवस्थापन समितीची चौकशी पूर्ण होईपर्यंत निलबंनाची कार्यवाही केली आहे.

-----------------

**दादर (मुंबई) येथील शारदाश्रम इंटरनॅशनल शाळेतील विद्यार्थिनीला परीक्षाशुल्क न भरल्याने परीक्षेला बसू न दिल्याबाबत**

**(५) * ५६६०५ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील शारदाश्रम इंटरनॅशनल शाळेतील इयत्ता दुसरीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीस तिच्या पालकांनी वेळेत फी न भरल्यामुळे परीक्षेला बसू न देता एका खोलीत डांबून ठेवल्याप्रकरणी पोलीसात तक्रार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी राज्य बालहक्क आयोग व शालेय शिक्षण विभागाने सदर शाळेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा खाजगी शाळांच्या मनमानी फी वसुलीबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय,

संबधित पालकांनी शिक्षण निरीक्षक कार्यालय तसेच पोलिसात तक्रार दिली आहे.

(२) संदर्भिय विद्यार्थ्यांनीची परिक्षा घेण्यात आली असून निकालही देण्यात आला आहे.

संबधीत शाळेतील मुख्याध्यापिका व संबधित शिक्षिके विरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आले आहे.तसेच मा.राज्य मानवाधिकार आयोगाकडे या प्रकरणाच्या दोन सुनावण्या झाल्या आहेत.

(३) खाजगी शाळांच्या शुल्क नियमनासाठी “महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ ची अमलंबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्ह्यात दिवाळीत देण्यात येणारे किट व रेशनचे धान्य मशीनमध्ये तांत्रिक बिघाडामुळे वाटप करण्यात आले नसल्याबाबत**

**(६) * ५७६७७ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिवाळी सणानिमित्त गरिबांना रेशन दुकानातून दिवाळी किट देण्याचे जाहीर केले परंतु मशीनमधील तांत्रिक बिघाडामुळे वितरण व्यवस्था विस्कळीत झाल्याने भंडारा जिल्ह्यात सुमारे २० टक्के लाभार्थ्यांना दिवाळी किट तसेच अनेक लाभार्थ्यांना नियमित मिळणारे धान्य मिळाले नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या कालावधीत ज्याचा अंगठा मशीनवर मॅच झाला त्यांनाच दिवाळी किट देण्यात आले परंतु त्यातील अनेक वस्तू गहाळ झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नियमित धान्य मिळत नसल्याने अंत्योदय व दुसऱ्या गटातील हजारो लाभधारकांना रेशनिंगच्या धान्याचा लाभ मिळाला नसल्याने त्यांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील सर्व शिधापत्रिका धारकांना दिवाळी किट व नियमित धान्याचे तातडीने वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे नियमित अन्नधान्य तसेच कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत मोफत अन्नधान्य वितरणाच्या ताणाने ई-पॉस प्रणालीवर उद्भवलेल्या तांत्रिक समस्यांमुळे ऑनलाईन पद्धतीने वितरण करताना येत असलेल्या अडचणींबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी तसेच लाभार्थ्यांना विहीत कालावधीत शिधाजिन्नस उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शिधाजिन्नस संचांचे वितरण ऑफलाईन पद्धतीने करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले होते.

भंडारा जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२२ च्या ऑनलाईन कि-रजिस्टर नुसार अंत्योदय व प्राधान्य कुटुंबाची शिधापत्रिका संख्या एकूण २,३०,२८९ अशी होती. या सर्व शिधापत्रिकाधारकांना शिधाजिन्नस संच तसेच नियमित मिळणारे अन्नधान्य वाटप करण्यात आले आहे.
(२) दिवाळी शिधाजिन्नस संच प्राधान्याने उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने ज्या शिधाजिन्नस ज्या जिल्ह्यात उपलब्ध होतील त्याप्रमाणे वितरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

दिवाळी शिधाजिन्नस संच वितरणाच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सुमारे ९८% शिधाजिन्नस संचांचे पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरण करण्यात आले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

अन्नधान्य वितरणाच्या ताणाने ई-पॉस प्रणालीवर उद्भवलेल्या तांत्रिक समस्यांमुळे शिधाजिन्नस संचांचे वितरण ऑफलाईन पद्धतीने करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले होते. तसेच जे पात्र लाभार्थी विहीत मुदतीत धान्य उचल करु शकले नाहीत, अशा लाभार्थ्यांना मुदतवाढीच्या कालावधीत अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सोलापूर जिल्हात मेफेन्टरमाईन इंजेक्शनची बेकायदेशीरविक्री होत असल्याबाबत

**(७)** * **५८५२७ श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील अन्न व औषध प्रशासन विभागास खेळाडूंना उत्तेजनासाठी वापरल्या जाणाऱ्या मेफेन्टरमाईन इंजेक्शनची बेकायदेशीर विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकलूज सह परिसरातील कुस्ती आखाडे व जिम मध्येही या इंजेक्शनचा वापर होत असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा व इतर स्पर्धांच्या पूर्वी डोपिंग टेस्ट सक्तीचे करण्याची मागणी अनेक क्रीडा संघटनांनी शासनाकडे केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मेफेन्टरमाईन इंजेक्शनची बेकायदेशीर विक्री रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) अशी मागणी या विभागाकडे अद्याप प्राप्त झालेली नाही.
(४) अन्न व औषध प्रशासनामार्फत केंद्र शासनाच्या औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ ची अंमलबजावणी केली जाते. तसेच Mephentermine या औषधांची विक्री रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनच्या प्रिस्क्रीप्शनशिवाय करता येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी सोलापूर जिल्हयांतील एकूण ०७ औषध विक्री पेढीच्या तपासण्या करण्यात आल्या, त्यापैकी ०३ औषध विक्री पेढीमध्ये डॉक्टरांचे प्रिस्क्रीप्शनशिवाय व विना विक्री बिलाने Mephentermine Sulphate Injection या औषधांची विक्री व्यायाम करणाऱ्या पहिलवानांना मोठया प्रमाणात केल्याचे आढळून आले. सदर पेढींना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे परवाने दि. ०१.०४.२०२३ पासून कायमचे रदद करण्यात आले व अनियमितीता आढळून आलेल्या ०३ किरकोळ व ०१ घाऊक औषध विक्रेता अशा एकूण ०४ औषध विक्री पेढीविरूद्ध अकलूज पोलिस स्टेशनमध्ये प्रथम खबर क्र.१३/२०२३, दि.०४/०१/२०२३ नोंदविण्यात आला. पोलिसासमवेत पुढील तपास सुरू आहे.तपासअंती संबधिताविरुद्ध खटला दाखल करण्यात येईल.
(५) लागू नाही.

-----------------

**गोवंडी (मुंबई) येथे नशा करण्यासाठी कोरेक्स औषधाचा वापर होत असल्याबाबत**

**(८) * ५८२९४ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोवंडी येथील बैंगनवाडी परिसरात (मुंबई) कोरेक्स खोकल्याचे औषध ड्रग्ज म्हणून घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरेक्स औषध हे अंमली पदार्थ व सायकोट्रोपिक पदार्थ कायद्याच्या अखत्यारीत येत असल्याने डॉक्टरांच्या चिठ्ठी शिवाय याचा वापर करणे शिक्षेस पात्र आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) Codeine हे घटकद्रव्ये असलेल्या औषधांच्या विक्रीसाठी डॉक्टरांच्या चिठ्ठीची आवश्यकता असते. अन्न व औषध प्रशासनाकडून नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या औषधांच्या खरेदी-विक्रीबाबत पडताळणी मोहिम घेण्यात येवून औषध विक्रेत्यांची तपासणी केली जाते व उल्लंघन आढळल्यास नियमोचित कारवाई घेण्यात येते.
(४) लागू नाही.

-----------------

## रुंझा (ता.केळापूर,जि.यवतमाळ) गावाच्या बाहेरुन जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधी मंजूर करण्याबाबत

**(९) * ६०३९९ डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुंझा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) गावातील वाहतुक कोंडी व अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने गावाबाहेरुन (वैकल्पीक मार्ग) तयार केलेल्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील वाहतुक कमी होण्यासाठी (वैकल्पीक मार्ग) बांधण्यात आलेले पुल व रस्त्याचे बांधकाम संबंधित कंत्राटदारांने निकृष्ट दर्जाचे केल्याने सदर रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करुन त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत तसेच संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रस्ते दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत सदर रस्त्यावर आवश्यक ठिकाणी खड्डे भरुन तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे.

सदर रस्ता वारंवार खचत असल्याचे निदर्शनास आल्याने या रस्त्याची पाहणी महाराष्ट्र अभियंत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांच्याकडून करण्यात आली असून, त्यांच्या अहवालानुसार अस्तित्वातील रस्त्याचा संपूर्ण भराव जमीन पातळी पर्यंत काढून IRC मानकाप्रमाणे बांधकाम करण्याचे सुचविण्यात आले आहे.

सदर रस्त्याबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करण्याकरीता या रस्त्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण आयुक्तांनी राज्यातील सीबीएसई शाळांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याचे दिलेले आदेश

**(१०) * ५६५११ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर**

**(अंबरनाथ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळांची संलग्नता मिळवण्यासाठी संस्थाचालकांना राज्य शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) पुणे येथील ३ शाळांना दिलेले ना हरकत प्रमाणपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आल्याप्रकरणी शिक्षण आयुक्तांनी राज्यातील ६६६ CBSE शाळांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट प्रमाणपत्राबाबत शिक्षण विभागामार्फत पुणे पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई आणि पुण्यात शासनाने काही शाळांना असे प्रमाणपत्र दिलेले नसतानाही संबंधित शाळांनी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या बनावट सही शिक्क्याच्या आधारे बोगस ना हरकत प्रमाणपत्र तयार करुन शाळा सुरु केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, राज्यात सीबीएसई मंडळाच्या सुमारे १ लाखांहून अधिक शाळा कार्यरत असून त्यातील सुमारे ६५० शाळांच्या युडायस माहितीमध्ये मान्यता क्रमांकाची नोंदच नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.पुणे, यांचेमार्फत समर्थ पोलीस स्टेशन,पुणे येथे दि.०९/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) हे अंशत: खरे आहे. राज्यात राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाच्या शाळांची संख्या १७२३ इतकी असून सीबीएसई शाळांची संख्या १२६१ इतकी आहे. राज्यात मदरशांसह अनधिकृत शाळांची संख्या ६२१ इतकी आहे.

(६) बोगस शाळांच्या बाबतीत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शाळांच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासण्यासाठी शिक्षण सह संचालक, प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती कडून शाळांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल .

(७) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**पंतप्रधान गरीब कल्याण योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या धान्याचे वाटप राज्यात पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत**

**(११) * ५७२९७ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अजित पवार (बारामती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री. अशोकराव चव्हाण (भोकर), श्री. झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने पंतप्रधान गरीब कल्याण योजनेअंतर्गत (पीएमजीकेवाय) सुरु केलेली मोफत धान्य वाटप योजना दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पासून बंद केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना बंद करुन त्याऐवजी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना अधिनियम, २०१३ अंतर्गत दरमहा २ किलो गहू व ३ किलो तांदूळ मोफत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन योजनेंतर्गत स्वस्त धान्य दुकानदारांना देण्यात येणाऱ्या कमिशनबाबत कोणताही उल्लेख नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोनामुळे मोठ्या प्रमाणात बाधित होऊन नागरिकांवर बेकारीची पाळी ओढावलेली असून दैनंदिन गरजा पुर्ण करणे शक्य नसताना ही योजना बंद करण्याचा निर्णय नागरिकांवर अन्यायकारक ठरणारा आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट नसलेल्या राज्यातील परभणी, नांदेड, बीड, जालना, औरंगाबाद, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या १४ जिल्ह्यांसाठी देखील मोफत धान्य पुरवठा करण्याचा निर्णय राज्य शासनाने सन २०१५ मध्ये घेतलेला

असताना आता केशरी (एपीएल) शिधापत्रिकाधारक तसेच राज्यातील शेतकऱ्यांना या नविन योजनेअंतर्गत धान्याचा पुरवठा होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाचे विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, यापूर्वी सुरु असलेली मोफत अन्नधान्य योजना पुन्हा सुरु करुन त्याअंतर्गत केशरी शिधापत्रिकाधारकांना या योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच स्वस्त धान्य दुकानदारांच्या कमिशनबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२३ पासून मोफत अन्नधान्याचे नियतन प्राप्त झालेले नाही.
(२) हे खरे आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय अन्नधान्य दि. १ जानेवारी, २०२३ ते दि. ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत मोफत वितरीत करण्यात येणार आहे.
(३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय अन्नधान्य दि. १ जानेवारी, २०२३ ते दि. ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत मोफत वितरीत करण्यात येणार आहे. सदर वितरणासाठी रास्तभाव दुकानदारांना प्रचलित दराने कमिशन अनुज्ञेय राहणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अन्नधान्याच्या मोफत वितरणासंदर्भात केंद्र शासनाच्या प्रतिनिधींसोबत दि. २९.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकीदरम्यान रास्तभाव दुकानदारांचे कमिशन अदा करण्याच्या कार्यपद्धतीबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील असे कळविण्यात आले असून त्यानुषंगाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत मोफत अन्नधान्य वितरणाची बाब केंद्र शासन स्तरावरील आहे.
(५) एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांसाठी आवश्यक अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या Non-NFSA योजनेंतर्गत करण्यात येत होती. तथापि, सदर योजनेंतर्गत अन्नधान्याची उचल थांबविण्यात येत असल्याचे भारतीय अन्न महामंडळाने कळविले आहे.
(६) एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी योजनेतील लाभार्थी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थी नसल्याने सदर लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्याचा लाभ अनुज्ञेय नाही.

रास्तभाव दुकानदारांना प्रचलित दराने कमिशन अनुज्ञेय राहणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अन्नधान्याच्या मोफत वितरणासंदर्भात केंद्र शासनाच्या प्रतिनिधींसोबत दि. २९.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकीदरम्यान रास्तभाव दुकानदारांचे कमिशन अदा करण्याच्या कार्यपद्धतीबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील असे कळविण्यात आले असून त्यानुषंगाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना अवगत करण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग-रोहा महामार्गावरील रस्त्याच्या विकासकामात झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(१२) * ५७११५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील अलिबाग ते रोहा या राज्यमार्गाच्या रस्ता विकासकामाचे १७७ कोटी रुपयाचे कंत्राट मेसर्स जे.आर.ए. रस्ता प्रकल्प प्रा. लि. या कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीने अग्रिम म्हणून १८ कोटी रुपये घेऊन कोणतेही काम न करता शासकीय निधीचा अपहार केल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपनी तसेच यास जबाबदार अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर रस्त्यांचे काम तात्काळ पुर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकल्पाच्या करारनाम्यातील तरतूदीनुसार कंत्राटदारास रक्कम रु.१३.१४ कोटी इतका मोबीलायझेशन ॲडव्हान्स देण्यात आला आहे. संबंधीत कंत्राटदाराने सुडकोली गावाजवळ बॅच मिक्स प्लांट व रेडिमिक्स काँक्रीट प्लांट उभारले आहेत.
(४) करारनाम्यातील तरतूदीनुसार दि. २२.०७.२०२२ पासून संबंधित कंत्राटदारावर प्रतिदिन रु. ८९,०००/- इतकी नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मु.पो.कोडाळी (ता. सेनगाव, जि.हिंगोली) येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहारामधून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत

**(१३) * ५७५६७ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.कोडाळी (ता. सेनगाव, जि.हिंगोली) येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहारामधून सुमारे ३० ते ३५ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाधित विद्यार्थ्यांना गोरेगाव उपकेंद्रात दाखल करून उपचार सुरू केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) शाळा व्यवस्थापन समितीने संबंधित अन्न शिजविणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना कामावरुन कमी केले आहे. तसेच, संबंधित मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दाओस येथे जागतिक आर्थिक परिषदेत शासनाने केलेल्या सामंजस्य कराराबाबत**

**(१४) * ५९०२२ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाओस येथील जागतिक आर्थिक परिषदेत शासनाने जगभरातील विविध कंपन्यांसोबत १.३७ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असल्याचा दावा राज्य शासनाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी इलेक्ट्रिक व्हेईकल क्षेत्रामध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक करणाऱ्या प्रकल्पाचा विस्तार नाशिकमध्ये होणार असल्याचे राज्य शासनाने अधिकृतरित्या जाहिर केले परंतु हा विस्तार नाशिक ऐवजी अहमदनगर येथे होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिषदेत राज्य शासनाने करार केलेल्या अनेक कंपन्या देशात व राज्यात नोंदणीकृत असताना सदरील कंपन्यांसोबत दाओस येथे जाऊन करार करण्यासंदर्भातील कारणे काय आहेत,

(४) तसेच, गडचिरोली जिल्हयाच्या चार्मोशीजवळील कोनसरीमध्ये स्टील प्लांट उभारण्यासाठी दाओस येथे वरद फेरो अलॉय प्रा.लिमिटेड या कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला परंतु या कंपनीकडे स्वत:ची लोह खनिजाची खाण व पुरेसे भांडवल नसतानाही हा करार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नविन उद्योग राज्यात येण्यासाठी द्यावयाच्या सवलती, विविध परवानग्या तसेच यातून रोजगार निर्मिती व स्थानिकांना प्राधान्य देण्यासंदर्भात तसेच उद्योगस्नेही धोरण अवलंबिण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महिंद्र इलेक्ट्रीक व्हेईकल ऑटोमोबाईल लि. घटक हा सनराईज सेक्टरमधील असून, इलेक्ट्रीक व्हेईकल निर्मिती हा उच्च तंत्रज्ञानावर आधारित या क्षेत्रातील प्रकल्प आहे. देशांतर्गत इलेक्ट्रीक व्हेईकलमध्ये रु.१०,००० कोटींची गुंतवणुक असणारा हा पहिलाचा प्रकल्प असून, सदर प्रकल्प पुणे येथे स्थापित होणारा नविन प्रकल्प आहे.

(३) भारतामध्ये गुंतवणुक करण्याकरीता संबंधित कंपनी देशामध्ये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. दावोस येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/राज्य शासनाशी सामंजस्य करार केलेल्या कंपन्या देशात/राज्यात नोंदणीकृत असल्या तरीही त्यांच्या एकूण गुंतवणुकीमध्ये थेट विदेशी गुंतवणुकीचा हिस्सा असल्यामुळे सदर कंपन्यांसोबत दावोस येथे सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही,

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील भूखंड वाटप समिती तपशीलवार प्रकल्प अहवालानुसार (Detailed Project Report),प्रकल्पाशी संबंधित आवश्यक सर्व बाबी तपासूनच भूखंड वाटपाबाबत निर्णय घेते.

(५) महाराष्ट्रामध्ये असलेले उद्योग पुरक वातावरण, अद्यावत औद्योगिक पायाभूत सुविधा, प्रगत आद्योगिक धोरण, सामुहिक प्रोत्साहन योजना, क्षेत्र निहाय विशेष औद्योगिक धोरणे तसेच EoDB ( Ease of Doing Business) अंतर्गत मोठया गुंतवणुकदारांना मार्गदर्शन तसेच गुंतवणुकीबाबत सर्वोतोपरी सहाय्य करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले रिलेशनशीप मॅनेजरर्स व रिलेशनशीप एक्झीक्युटीव्ह तसेच प्रमुख विदेशी गुंतवणुकदारांना सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले समर्पित विदेश कक्ष, एक खिडकी योजना इत्यादींमुळे नविन उद्योग राज्यात येण्यासाठी राज्यात गुंतवणुकस्नेही वातावरण तयार झाले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील पाथरी-परभणी राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ चे काम निकृष्ट दर्जाचे व अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१५) * ५७९१४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील पाथरी-परभणी राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ वर गत ४ वर्षात झालेल्या २१८ अपघातात १२० नागरिकांचा बळी गेल्याचे कागदोपत्री नमूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ ते २०२१ या चार वर्षात सदर कंत्राटदार कंपन्यांनी कोट्यवधी रुपये खर्च करुनही या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे व अपूर्णावस्थेत असल्याने महामार्गाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी-जिंतूर व गंगाखेड-परभणी या दोन महामार्गासाठी केंद्र व राज्य शासनाने मंजूरी देऊन ४०० कोटी रुपयांची कामे सुरु केली असून काम पूर्ण होण्याआधीच या रस्त्यांवर भेगा पडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट व अपूर्ण कामे करणाऱ्या कंपनीवर कारवाई करून सदर महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.
या कालावधीत ७० अपघात झाले असून ७१ मृत्यु झाले आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
केलेले काम हे निविदेतील अटी व शर्तीचे पालन करुनच केलेले आहे. सदर कामाचे कंत्राटदार हे अतिशय संथ गतीने काम करत होते. अस्तित्वातील काम न झालेल्या रस्त्याच्या लांबीत संबंधित कंत्राटदाराकडुन तात्पुरत्या स्वरुपात वेळोवेळी खड्डे भरण्यात आले होते. तथापि विहित वेळेत काम न केल्यामुळे, काम न झालेल्या लांबीत रस्त्याची दुरावस्था झाली होती.
(३) अंशत: खरे आहे.
परभणी-जिंतूर महामार्गाचे काम पुर्णत्वास आले असून सदर रस्त्यावर भेगा पडल्या असल्याचे निदर्शनास आले नाही. गंगाखेड-परभणी रा.म.क्र.७५२ K हया कॉंक्रीट रस्त्याचे काम ९९.०४ % काम पूर्ण झाले असून रस्त्याला काही ठिकाणी भेगा पडलेल्या आहेत. सदर भेगांची दुरुस्ती IRC-८३ मानकाप्रमाणे कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने करण्यात येत आहे.

(४) पाथरी-परभणी रा.म.क्र.६१ महामार्गासाठी नेमलेल्या कंत्राटदाराची कामाची संथ प्रगती लक्षात घेऊन वेळोवेळी कंत्राट रद्दबादलचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि.०९.०३.२०२२ रोजी केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने सदरील कंत्राट रद्द करुन रु.१५.२४ कोटी रुपयांची बँक गॅरंटी वसूल करुन शासनास जमा केली. निविदा प्रक्रियेचा वेळ वाचावा व राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकर पुर्ण व्हावे यासाठी उर्वरित कामाची निविदा केंद्र शासनाने कंत्राट रद्द करण्याआधीच प्रसिद्ध केली. सद्यस्थितीत निविदेची प्रक्रिया पुर्ण झाली असुन M/S BRN Balaji JV या कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. रस्ता सुस्थितीत असुन नवीन कंत्राटदाराने काम सुरु केलेले आहे.

तसेच गंगाखेड-परभणी रा.म.क्र.७५२ K या काँक्रीट रस्त्याचे काम झाल्यानंतर पावसाळयात झालेल्या अतिवृष्टीदरम्यान नैसर्गिक नाल्यामध्ये शेतक-यांनी भराव केल्यामुळे पाण्याचा निचरा न झाल्यामुळे नाल्यालगतच्या लांबीमध्ये Subgrade मध्ये Moisture Content वाढल्यामुळे काँक्रीटला (PQC) काही भेगा पडल्याचे निदर्शनास आले होते रस्त्याचे काँक्रीट पॅनल दुरुस्तीचे काम कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने सुरु असून ९० % दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलादपूर ते महाडदरम्यानच्या (जि.रायगड) पुलाचे लोखंडी चॅनेल तुटले असल्याबाबत

**(१६) * ५७५८१ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर ते महाड दरम्यानच्या सावित्री नदीवरील नवीन पुलाचे लोखंडी चॅनेल तुटल्याने नागरिकंच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पावधीत बांधलेल्या सदर पुलाचे संरचनात्मक लेखापरिक्षण न करताच लोकार्पण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या संरचनात्मक लेखापरिक्षण व कामाच्या दर्जाबाबत शासनाने चौकशी करुन पुल दुरुस्ती करचे तसेच दोषींवर कारवाईकरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

सावित्री पुलाचे जानेवारी २०२३ च्या दरम्यान पुलाच्या स्लॅबला जोडणा-या एका Expansion Joint चे काँक्रीट निघून गेल्याने सुमारे ३.५० मी. चा तुकडा निघाला होता. सदर Expansion Joint चे काँक्रीट तात्काळ करुन घेण्यात आले असून सदर पुलावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

IRC मानांकनानुसार सावित्री पुलाच्या कामाची गुणवत्ता राखण्यात आली असून सदर पुलांचे लोकार्पण करणे पूर्वी मे.ध्रुव कन्सल्टंसी मार्फत IRC मानांकनानुसार आवश्यक त्या सर्व चाचण्या घेऊन करण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांबाबत

**(१७) * ५६६६३ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील बारा वर्षात शिक्षक भरती न केल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुमारे १८ हजार तसेच नगरपालिका, महापालिका, खाजगी अनुदानित शाळा, अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय आश्रम शाळांमधील सुमारे ५० हजार शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सन २०२१-२२ पासून माध्यमनिहाय संच मान्यतेनुसार ११२ शिक्षकांची पदे रिक्त असून नियमबाह्य पद्धतीने शिक्षकांच्या बदल्या केल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये रिक्त शिक्षकांची संख्या वाढून शिक्षणाचा दर्जा खालावला असून विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित रहात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुमारे साडेचार हजाराहून अधिक डी.एड. उमेदवार असून गत बारा वर्षात शिक्षक भरती न झाल्यामुळे काहींची वयोमर्यादाही संपत आल्याने त्यांच्यात उदासिनता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत राज्य शिक्षक संघ यांनी दि. १६ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षणाधिकारी, अमरावती यांच्याकडे तसेच डी.एड. बेरोजगार संघटनेने मा.शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे दि.१६ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे रिक्त पदे भरण्याची मागणी केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दीर्घकाळ शिक्षकांची पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच दिनांक १९ जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत राज्यभरात शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळून शिक्षकांची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) राज्यातील शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त माहितीच्या आधारे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील एकूण ६५,१११ इतकी शिक्षकीय पदे रिक्त आहेत.

शासकीय आश्रमशाळेत १५४६ व अनुदानित आश्रमशाळेत ७२२ शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

भिवंडी निजामपूर, शहर महानगरपालिकच्या शाळांमध्ये सन २०२१-२०२२ च्या संचमान्यतेप्रमाणे भिवंडी मनपाच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील एकूण ४० पदे रिक्त आहेत.

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कार्यरत शिक्षकाकडून आवश्यक अध्यापनाचे कामकाज पूर्ण करुन घेण्यात येत आहे. तसेच शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये सन २०११ ते सन २०१९ या कालावधीत एकूण ३६४ पदे भरण्यात आली असुन, सध्या ६५१ पदे रिक्त आहेत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ नुसार शिक्षक भरतीसाठी शासन निर्णय दिनांक १०.११.२०२२ अन्वये, उमेदवारांचे वय २ वर्षासाठी शिथिलक्षम करण्यात आले आहे.

(४), (५) व (६) सन २०१२ मध्ये विशेष पडताळणीमध्ये बोगस विद्यार्थी संख्या आढळून आल्याने तसेच अतिरिक्त शिक्षक समायोजन करण्याकरीता सन २०१६ पर्यंत शिक्षक भरतीस बंदी होती. तसेच कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली परिस्थितीमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन शासनाने दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये पदभरती बंदीचा निर्णय घेतला होता.

सन २०१० मध्ये घेण्यात आलेल्या केंद्रीय भरती पुर्व परीक्षेमध्ये मा.न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या पुर्नपडताळणी समितीने दिलेल्या निर्देशानुसार ३१३९ उमेदवारांची सन २०१४ मध्ये जिल्हा परिषदेकडे शिफारस करण्यात आली होती.

तसेच सन २०१७ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीनुसार मुलाखती शिवाय ५९७० व मुलाखतीसह १९३३ उमेदवारांची शिक्षकपदी नियुक्ती करीता शिफारस करण्यात आलेली आहे.

तसेच राज्यातील अल्पसंख्यांक शाळेतील १७४७ अत्यावश्यक पदे भरण्यास परवानगी देण्यात आली आहे.

तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT)-२०२२ ची परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात अंदाजे ३०००० पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------------

## मुंबई-गोवा महामार्गांचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * ५६५८२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गांच्या चौपदरीकरण आणि रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना या आश्वासनाची पूर्तता करण्यास (एनएचएआय) अपयशी ठरल्याने तसेच सुमारे १२ वर्षांपासून या महामार्गाचे काम प्रलंबित असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या या कामांबाबत मा.उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल ते इंदापूर मधील सुरूवातीचा ० ते ४२ कि.मी. च्या पट्टयाचे काम पुर्ण झाल्याचे प्रतिज्ञापत्र NHAI ने मा.न्यायालयासमोर सादर केले असून याच मार्गादरम्यानच्या ४२.३ कि.मी. ते ८४.६ कि.मी. च्या रस्त्याचे कंत्राट देण्यात आलेल्या मेसर्स कल्याण टोल इन्फ्रा लि. या कंपनीने कोणतेही काम केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गाच्या कामाची जबाबदारी ही राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची असून काम मोठ्या प्रमाणात अपूर्ण असतानाही तसेच राज्य शासनाकडून या विषयी प्राधान्याने कोणतीही कार्यवाही होत नसतानाही या संपुर्ण टप्प्याचे काम मे-२०२३ पर्यंत पुर्ण होईल अशा स्वरुपाचे प्रतिज्ञापत्र मुख्य सरकारी वकिल यांनी मा.न्यायालयात सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या महामार्गाचे काम अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्डयांमुळे येथे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असे असताना या महामार्गावर अपघातग्रस्तांना वैद्यकीय सेवा तात्काळ मिळण्याबाबत प्रत्येक ५० किंवा १०० कि.मी. अंतरावर एक ट्रामा सेंटर उभारण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन महामार्गाची प्रलंबित कामे तात्काळ पुर्ण करुन निकृष्ट काम करणाऱ्यांवर कारवाई करुन तसेच ट्रामा केअर सेंटर उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

कि.मी.४२.३ ते कि.मी. ८४.६ लांबीमध्ये असलेला दोन लेनचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने रस्त्याचा खराब भाग डांबरीकरणाने दुरुस्त करण्याचे मंजूर असून त्या संदर्भातील कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) अंशत:खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत चौपदरीकरणाचे उर्वरीत कि.मी.४२ ते कि.मी.८४ या लांबीचे काम १८ महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेली कि.मी. ८४/०० ते कि.मी.४५०/१७० या लांबीचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) अंशत: खरे आहे.

मुंबई गोवा महामार्गाच्या लांबीतील पावसाळयांत पडलेले खड्डे माहे डिसेंबर २०२२ पूर्वी भरण्यांत आले असून तद्नंतरही चालू कामामुळे, अवजड मशीनरी फिरत असल्याने पडलेले खड्डे व वळण रस्ते यावरील वाहतूक वर्दळीमुळे पडणारे खड्डे भरण्याचे काम नियमितपणे सुरु आहे.

(५) होय.

(६) महामार्गावर मुंबई गोवा महामार्गाचे इंदापूर ते करोडी परशुराम घाट (कि.मी.८४/०० ते कि.मी.२०५/४००) या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे असलेल्या लांबीमध्ये कि.मी.१२६.५०० मौजे महाड येथे ट्रामा सेंटर उपलब्ध आहे. तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणातर्फे खारपाडा टोल नाका येथे १ व सुकेळी घाट येथे ०१ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती मिळत नसल्याबाबत**

**(१९) * ५६७८८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेली प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकडून प्री मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरून प्रमाणित केल्यावर सदर अर्ज फेटाळण्याच्या सूचना शिक्षण संचालक (योजना) यांनी दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिली ते दहावी पर्यंतच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळणारी प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणे बंद असल्याने विद्यार्थी आणि पालकांची आर्थिक अडचण निर्माण झाल्याने अनेक शैक्षणिक समस्या उद्‌भवल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक समाजातील इ. १ ली ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी लागू असलेली प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाच्या दि.२९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये इयता १ ली ते ८ वी वगळून इयत्ता ९ वी व १० साठी मर्यादीत ठेवण्यात आली आहे. सबब, केंद्राच्या दि.२९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार इयता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज फेटाळण्यात आले आहेत.
(४) इयता १ ली ते ८ वी मधील विद्यार्थांची शिष्यवृत्ती पुर्ववत सुरु रहावी या करीता शासनाच्या दि. २१.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खर्डी एमआयडीसी (ता.शहापूर,जि.ठाणे) करिता संपादीत केलेल्या जमिनींचा प्रकल्पग्रस्तांना अद्याप मोबदला मिळाला नसल्याबाबत

**(२०) * ५८७०३ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील प्रस्तावित महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळासाठी मौ.वरखोल, सुगांव, बेंडेकोन, पिंपळवाडा आणि खर्डी येथील ७०६ शेतकऱ्यांच्या जवळपास ३१५ हेक्टर जमिनी संपादीत करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी ४० टक्के म्हणजे ३०० प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून संबंधित यंत्रणेला निधी प्राप्त होऊनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप मोबदला देण्यात आला नसल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी मोबदला रक्कमेची वारंवार मागणी करुनही तेथील अधिकारी अनेक तांत्रिक कारणे सांगून टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांना मोबदला रक्कम देण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

खर्डी औद्योगिक क्षेत्राकरिता ३१५.०४.९४ हे. आर. क्षेत्रास दि.१४/०२/२०१९ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण-६ च्या तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत. तसेच दि. २२/०८/२०१९ रोजी एकूण २९७.२९.३५ हे.आर. क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये कलम ३२ (१) च्या तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत.
(२) (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

खर्डी औद्योगिक क्षेत्राकरिता शेतक-यांना वाटप करण्यासाठी आजपावेतो रू. ५३२ कोटी निधी भूसंपादन अधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यापैकी याआधी रू.४७८.८८ कोटी रक्कम भूधारकांना वाटप करण्यात आली आहे व उर्वरीत क्षेत्राकरीता रू. ५३.१२ कोटी रक्कमेचे वाटप करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचेमार्फत सुरू आहे.

मौजे वरस्कोळ-२७, पिंपळपाडा-१०, खर्डी ०३ असे एकूण ४० हरकती अर्ज उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे कार्यालयास प्राप्त झालेले असून सदर प्रकरणांची उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्या कार्यालयीन स्तरावर सुनावणी सुरू आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ग्लॅनमार्क या औषध कंपनीच्या नावाने बनावट औषध विक्री होत असल्याबाबत

**(२१) * ५८९०९ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम**

**(अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लॅनमार्क या, औषध कंपनीचे हृदयरोगावर उपयुक्त असे "टेलमा" नावाचे औषध आहे याच नावाचा बनावट औषधाचा लाखो रुपयांचा साठा कल्याण, जि.ठाणे येथील घाऊक विक्रेत्यांकडून पोलिसांनी जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सवलतीच्या प्रलोभनामुळे नागरिकांचे आयुष्य धोक्यात आले असून अशा औषधांवर शासनाने नियंत्रण ठेवण्याबाबत अनेक औषध विक्रेत्यांकडून मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याबाहेरून येणाऱ्या औषधांवर नियंत्रण व तपासणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२) औषध विक्रेत्यांची या स्वरूपाची मागणी अद्याप या विभागास प्राप्त झालेली नाही.

(३) ग्लॅनमार्क या औषध कंपनीची हृदय रोगावर उपयुक्त असे "टेलमा" या नावाने लाखो रुपयांचा बनावट औषध साठा कल्याण जि. ठाणे येथील घाऊक विक्रेत्यांकडून पोलिसांनी जप्त केला असून पुढील चौकशी तपासकाम चालू आहे. सदर प्रकरणी ठाणे कार्यालयातील औषध निरीक्षक यांनी परराज्यातून औषध खरेदी करणाऱ्या पूरवठादारांची तपासणी करण्यात येवून परराज्यातून खरेदी केलेल्या औषधसाठातून ३४ औषध समूहांचे नमूने चाचणी व विश्लेषणांसाठी घेण्यात आले असून सदर नमूने अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा मुंबई येथे सर्वोच्च प्राधान्याने चाचणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. सदरचे अहवाल अद्याप प्रलंबित आहेत.

तसेच सदर औषधांच्या खरेदी-विक्रीबाबत पडताळणी करण्यात येवून संबधित औषध वितरक यांना ठाणे कार्यालयामार्फत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून पूढील कार्यवाही घेण्यात येत आहे.

तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून राज्याबाहेरून येणाऱ्या औषधांवर नियंत्रण ठेवण्यासाठी औषध निरीक्षक यांचेद्वारे औषध विक्री पेढयांच्या नियमित तपासण्या करण्यात येवून औषध विक्रेत्यांची तपासणी केली जाते व उल्लंघन आढळल्यास नियामोचित कारवाई घेण्यात येते.

(४) लागू नाही.

-----------------

## जिल्हा परिषदेच्या शाळांमधून दर्जेदार शिक्षण मिळण्याबाबत

**(२२) * ५८१३४ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हापरिषदेच्या शाळेच्या पटसंख्या ० ते २० च्या आत आहेत त्या शाळा तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे दुर्गम भागातील अनेक गोरगरीब, बहुजन व शेतकऱ्यांची मुले मोफत व सक्तीच्या शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढवून दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जाम (जि.वर्धा) ते वरोरा (जि.चंद्रपूर) रस्त्यावरील साखळी पुलाच्या बांधकामाबाबत

**(२३) * ५६५४९ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जाम (जि.वर्धा) ते वरोरा (जि.चंद्रपूर) रस्त्यावर साखळी पुलाच्या बांधकामाचे काम मेसर्स खरे ॲण्ड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला सन १९९७ साली २.२६ कोटी रुपयांना देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर बांधलेल्या या पुलाच्या कामात शासनामुळे नुकसान झाल्याने सदरहू वाद लवादापर्यंत गेला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने स्थापित केलेल्या लवादाने व प्रथम न्यायालयाने या प्रकरणी निर्णय दिल्यानंतर कंत्राटदाराचे देयक अदा करणे अपेक्षित असताना अधिकाऱ्यांनी सदरचे प्रकरण प्रतिष्ठेचे करुन विविध न्यायालयात अपिल केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटदार कंपनीला द्यावयाची रक्कम, न्यायालयाची फी, वकीलांचे मानधन इ. अनेक खर्चापोटी शासनाला रुपये ५ कोटी ऐवजी सुमारे रुपये ३०० कोटी खर्च करावे लागले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उद्योजकाने दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने एकल लवादाची नियुक्ती करण्यात आली.
(३) सदर प्रकरणी एकल लवादाने दि.०४.०३.२००४ रोजी दिलेल्या निवाड्याबाबत मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने दि.१५.१२.२००६ रोजी शासनाचे अपील फेटाळले. याविरोधात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे लवाद व समेट अधिनियम, १९९६ च्या तरतुदीप्रमाणे अपील दाखल करण्यात आले. मा.उच्च न्यायालयानेही अपील फेटाळल्याने सा.बां.विभागातर्फे विधी व न्याय विभागाच्या सहमतीने विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. सदरहू याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०१.१२.२०२१ रोजी फेटाळली.

(४) सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार परिगणित होणारी दाव्याची रक्कम सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने संबंधित उद्योजकास अदा करण्यात आली आहे.
(५) सदर प्रकरणी जाचक निविदा अटी व शर्ती सवलत करारनाम्यात समाविष्ट केल्याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, नागपूर यांना कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त होताच अहवालातील निष्कर्षाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कात्रज-देहूरोड (जि.पुणे) बाह्यवळण मार्गाचे काम प्रलंबित असल्यामुळे अपघात होत असल्याबाबत

**(२४) * ५७५६१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील कात्रज – देहुरोड बाह्यवळण मार्गावर कात्रज परिसरात राजमाता भुयारी मार्गाला समांतर १२ मीटर रुंद व साडेचार मीटर उंचीच्या भुयारी मार्गाला राष्ट्रीय महामार्ग विभागाने मंजूरी दिल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील अपघातांचे वाढते प्रमाण पाहता अनेक महिन्यांपासून ही प्रलंबित कामे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, कात्रज नवीन बोगदा ते नवले पुलापर्यंत परिसरातील तीव्र उताराच्या ठिकाणी जांभूळवाडी, कोळेवाडी, आंबेगाव, न-हे या ठिकाणी देखील मोठया प्रमाणात अपघात वाढलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर काम तातडीने पुर्ण करुन अपघात रोखण्याच्यादृष्टीने उपाययोजना करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) कि.मी.२/४६० येथील पुणे महानगरपालिकेचा डीपी रस्ता व कि.मी.३/०७० येथील राजमाता भुयारीमार्गाच्या जागी अस्तित्वातील भुयारी मार्ग तोडून नविन भुयारी मार्ग बांधण्याच्या कामास केंद्र शासनाकडून दिनांक १२.१०.२०२२ रोजी वाव बदल अंतर्गत मंजूरी मिळाली असून सदरचे काम सुरु करण्यात आले असून प्रगतीपथावर आहे. तसेच सदर काम तात्काळ प्राथमिकतेने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(३) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील सातारा (शेंद्रे) ते पुणे (देहू रोड) केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांचे अखत्यारीत असून यात कात्रज नविन बोगदा-जांभूळवाडी-दरीपुल-न-हे-नवलेपूल-वडगाव-वारजे या १० कि.मी.लांबीच्या महामार्गाचा समावेश आहे.

दरीपुल ते नवले पुल च्या दरम्यान महामार्गाचा उतार (ग्रेडियंट) ३.४८ टक्के असून तो आय.आर.सी.ने प्रमाणित केलेल्या मानकानुसार योग्य आहे. तसेच दरीपुल येथील वळणावर आवश्यक ते सूचना फलक व इतर तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

कात्रज नविन बोगदा ते नवले पुल च्या दरम्यान जे अपघात झाले आहेत ते बहुतांशी ट्रक व अवजड वाहने न्युट्रल गिअर मध्ये चालविण्यामुळे व वाहनचालकाच्या निष्काळजी पणामुळे तसेच काही अपघात वाहनाच्या तात्रिक बिघाडामुळे झालेले आहेत.

(४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

अ) सदरील भागात सर्व ठिकाणी ६० कि.मी. प्रतितास वेग मर्यादा सुचना फलक तसेच एमबीसीबी,रम्बल स्ट्रिप्स, लेन मार्किंग,कॅट आईज, स्ट्रीट लाईटिंग, अपघात प्रवण क्षेत्र दर्शविणारे सुचना फलक, ब्लिंकर्स इ. बसविण्यात आलेअसून न-हे येथील सेल्फी पॉईट जवळ स्पीड कॅमेरा बसविण्यात आलेला आहे.

ब) दरीपुल ते सिंहगड रोड पर्यंत डाव्या बाजूचा सेवा रस्ता बांधण्यात आलेला आहे. उजव्या बाजूस सिंहगड रोड ते इंद्रायणी शाळेपर्यंत सेवा रस्ता असून न-हे स्मशानभूमि जवळ महामार्गाच्या बाजूने समांतर नाला असल्यामुळे महामार्गाच्या हद्दीत सेवा रस्ता होवू शकत नाही. त्याबाबत सदर ठिकाणी पुणे महानगर पालिकेकडून सेवा रस्ता पूर्ण करणेबाबत प्रस्तावीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) येथील २२ शाळांना स्वमालकीची इमारत बांधून देण्याबाबत

**(२५) * ५७६२९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील एकुण २२ शाळा गेल्या दहा वर्षापेक्षा अधिक काळापासून भाडेतत्वावर सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून केवळ इमारत बांधकामासाठी निधी देण्याची तरतूद असून जागेचा मोबदला देण्याची तरतूद नसल्याने शाळेसाठी स्वमालकीची जागा मिळविताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांना स्वमालकीची इमारत देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राजापूर (जि. रत्नागिरी) येथील एकूण २० शाळा गेल्या दहा वर्षांपासून अधिक काळापासून भाडेतत्वावर भरविल्या जात आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) ज्या जागा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या आहेत अशा शाळांना आवश्यकतेनुसार नवीन वर्गखोली बांधकामाकरिता अनुदान जिल्हा वार्षिक योजना वा इतर काही योजनांमधुन देण्यात येते.

-----------------

## मुंबईतील सैफी रुग्णालयामध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णाचा बनावट इंजेक्शनमुळे मृत्यू झाल्याबाबत

**(२६) * ५६६०७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्नीरोड, मुंबई येथील सैफी रुग्णालयात रक्तातील तांबडया पेशी कमी झाल्याने उपचार घेत असलेल्या श्री.विवेक कांबळी या रुग्णाचा अप्रमाणित इंजेक्शनमुळे मृत्यू झाल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या ( एफडीए) चौकशीत स्पष्ट झाल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील इंजेक्शनचे नमुने तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेत पाठवले असता त्यात दोष आढळून आल्यामुळे व्ही.पी. रोड पोलिस ठाण्यात सैफी रुग्णालयातील औषध विक्रेत्यांसह ठाणे, पुणे, औरंगाबाद तसेच दिल्लीतील ११ विक्रेते व पुरवठादारांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधित कंपनी व औषध विक्रेत्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड :** (१) यासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाकडे दि.०४.११.२०२२ रोजी ईमेलद्वारे तक्रार प्राप्त झाली आहे. तक्रारदाराने सैफी रुग्णालय, मुंबई येथे Orofer FCM Injection या इंजेक्शमुळे रिॲक्शन येवून रुग्णांचा मृत्यू झाल्यांचे कळविले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात येवून एकूण १२ औषध विक्रेत्यांविरूद्ध व्ही. पी. रोड पोलिसस्टेशन गिरगाव, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल क्र.०८/२०२३ दि. ०७/०१/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर प्रकरणात दि.१०/०२/२०२३ रोजी एकूण ०३ आरोपींना दिल्ली येथे जाऊन पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास चालू आहे..

(४) लागू नाही.

-----------------

## राज्यातील प्राध्यापक पद भरतीबाबत

**(२७) * ५६९५६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रणधीर सावरकर(अकोला पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राध्यापक पद भरतीबाबत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ ही शेवटची तारीख निश्चित केल्यानंतरही ना हरकत प्रस्तावाला उच्च शिक्षण संचालकांकडून मान्यता दिली जात नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राध्यापक पद भरती गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयातील प्राध्यापक पद भरतीबाबत वारंवार निर्देश देऊनही पदभरती करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे अनेक नेट, सेट, पीएचडी धारक प्राध्यापकांना तासिका तत्त्वावर काम करावे लागत असून त्या पदाला अनुज्ञेय सवलतीपासून त्यांना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
सद्यस्थितीत सहायक प्राध्यापक पदभरतीस ना-हरकत प्रमाणपत्र मागणीचे प्रस्ताव स्विकृत करण्याची कार्यवाही सुरु आहे. दिनांक १०.२.२०२३ पर्यंत ६६१ सहायक प्राध्यापक पदांच्या पदभरतीस नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.
(३) पदभरती प्रक्रिया सुरू असल्याने हे खरे नाही.
(४) वर नमुद केल्याप्रमाणे पदभरतीची प्रक्रिया सुरू असून त्यासंदर्भात शासनाकडून पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत:-

१. सहायक प्राध्यापक या संवर्गातील एकुण २०८८ पदांच्या पदभरतीस दिलेल्या मान्यतेस अनुसरून दिनांक ३०.१०.२०२२ पुर्वी ना-हरकत प्रमाणपत्रासाठी मागणीपत्र सादर करण्याच्या सूचना राज्यातील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत.

२. ज्या महाविद्यालयाने उक्त कालमर्यादेत मागणी पत्र सादर न केल्यास त्यांना वाटप करण्यात आलेली पदे ज्या महाविद्यालयांनी NACC, A+ व A दर्जा प्राप्त केलेल्या महाविद्यालयांना शासन मान्यतेने वाटप करण्यात यावीत अश्या दिनांक ११.१०.२०२२ च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खैरे-सारंगपुरी (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्यावरील पुलाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२८) * ५८८१५ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खैरे-सारंगपुरी (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्यावरील पुलाच्या कामाला वाढीव परिमाणाची मंजुरी देऊन कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांची देयके काढून गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियम व अटींचा भंग करुन वाढीव परिमाणाचे रुपये ८२ लाख रुपयांचे चुकीचे देयक काढून कंत्राटदाराला ३२ लाख रुपये अदा केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामाची तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुलाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व दोषी अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) निवेदन प्राप्त आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने कामाची तपासणी करुन अहवाल सादर करणेकरिता अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण यांना सूचित करण्यात आले आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर, अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील डी.एड. झालेल्या बेरोजगार तरुणांची शिक्षक म्हणून नियुक्ती करणेबाबत

**(२९) * ५८७४८ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ० ते २० पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यास विरोध होत असल्याने त्या शाळा बंद न करता कमी पटसंख्याच्या शाळेत तरुण पात्रताधारक शिक्षक उपलब्ध असतांना सुध्दा शासन कंत्राटी व सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करणार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षापासून शिक्षक भरती प्रलंबित असून डी.एड., बी.एड. झालेल्या बेरोजगार तरुणांना रोजगार न देता सेवानिवृत्त शिक्षकांना संधी देण्यात येत असल्याने या निर्णयामुळे तरुणांवर अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत दोन विरुध्द मतप्रवाह असून बेरोजगार तरुणांमध्ये मोठया प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पटसंख्या वाढविण्याबाबत इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीचे दिनांक २२ फेब्रवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकांची पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे.

(४) शाळेतील विद्यार्थी पटसंख्या वाढविण्याकरीता शाळांना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असते. तसेच त्यासंदर्भात शासनाकडून गणवेश वाटप, पाठ्यपुस्तक वाटप, शालेय पोषण आहार योजना, डिजीटल शिक्षण, उपस्थिती भत्ता हे उपक्रम राबविण्यात येतात.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीला मंजूरी मिळणेबाबत**

**(३०) * ५६५५१ श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचा-यांच्या वेतनवाढीच्या संदर्भांत सर्वोच्च न्यायालयाने समान काम, समान वेतन या नियमाप्रमाणे कायमस्वरुपी कर्मचा-यांप्रमाणे वेतन द्यावे असे निर्देश दिले असतानाही विद्यापीठ प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत १०० अस्थायी कर्मचाऱ्यांना कार्यपदानुसार वेतन वाढ देण्याचे मंजूर करण्यात आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीला मंजूरी मिळून बरेच दिवस होऊनही कर्मचाऱ्यांना अद्यापही जुन्याच वेतनावर काम करावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी २०२३मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(४) तसेच, खाजगी संस्थेकडून नेमण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन आणि कंत्राटी तसेच रोजंदारी पध्दतीवर गत १५ ते २० वर्षांपासून काम करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या वेतनात कमालीचा फरक असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, समान वेतनासंदर्भांत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत तसेच प्रस्तुत प्रकरणी निर्णयाच्या अंमलबजावणीस विलंब करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२६.०७.२०२२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार विद्यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांना दि.०१.०७.२०२२ पासून किमान वेतनश्रेणीनुसार मूळ वेतन देण्यात येत आहे.
(४) हे अशंत: खरे आहे.
मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हंगामी स्वरूपात कार्यरत सुरक्षा रक्षकांना किमान वेतनश्रेणीनुसार मूळ वेतन अदा करण्यात येत आहे. तसेच सुरक्षा रक्षक मंडळामार्फत नियुक्त सुरक्षा रक्षकांना संबंधित मंडळाने ठरविलेल्या वेतन व भत्यानुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

(५) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विद्यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांना किमान वेतनश्रेणीनुसार मूळ वेतन देण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.